लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगाचा एक तुलनात्मक अभ्यास (२०११ - २०२१)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. अंतर्गत मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोध प्रबंधाचा संक्षिप्त आराखडा.

~: संशोधक :~

साबणे प्रशांत दत्तात्रय

~: मार्गदर्शक :~

प्रा. डॉ. आनंद तुकाराम शेवाळे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.

~: संशोधन केंद्र :~

सामाजिक शास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड. उपकेंद्र, लातूर.

~: शैक्षणिक वर्ष :~

(सप्टेंबर - २०२३)

1) प्रस्तावना

जगामधील वेगवेगळ्या देशामध्ये दारिद्र्य या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. 1981 मध्ये जागतिक बॅंकेने '1$ क्रयशक्ती प्रतिदिन प्रतिव्यक्ती, ही दारिद्र्यरेषा ठरविली यानुसार जगामध्ये 52% व भारतात 60% दारिद्र्य आढळले. 2011 मध्ये नवीन निकषानुसार जागतिक स्तरावर 2012 मध्ये 12.7 % दारिद्र्य या निकषानुसार भारतातील दारिद्र्याचे प्रमाण 2011 मध्ये 21.2% म्हणजे (26.81) कोटी लोक आढळले. मादागास्कर मध्ये सर्वाधिक दारिद्र्याचे प्रमाण (81.8%) आढळले परंतु दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या विचारात घेता ती सर्वाधिक भारतात जगातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येच्या 29.5 % होती. भारतात दारिद्र्यरेषा विचारात घेता, 2011 मध्ये तेंडुलकर समितीच्या मोजणी पद्धतीनुसार भारतातील दारिद्र्याचे प्रमाण 21.9% होते CSO – (Central Statistics office) केंद्रीय सांख्यिकी संस्था हे दारिद्र्याच्या उत्पन्नाची गणना करते तर NSSO – (National Sample Survey Organisation) राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण संघटन होते ते आता National Simple Survey Office या नावाने ओळखले जाते व ते दारिद्र्य मोजण्याचे काम करते.

भारतामध्ये दारिद्र्य हे खूप मोठ्या प्रमाणात वाढत चाललेली समस्या बनली आहे. त्या बरोबरच महाराष्ट्रात ही समस्या असलेली दिसते. 2011 च्या जनगणनेचा विचार केला असता, लोकसंख्या वाढीबरोबर दारिद्र्याचे प्रमाण हे वाढत जाताना आपणास दिसते. 2011 च्या जनगणनेवेळी महाराष्ट्रातील लोकसंख्या 11.42 कोटी होती, तर ती सध्या स्थितीमध्ये वाढत जात असताना दिसते. या वाढत्या लोकसंख्येला आळा घातला पाहिजे. वाढत जाणारे दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करणे गरजेचे आहे. मराठवाड्यामधील छत्रपती संभाजीनगर विभागातील लातूर एक जिल्हा आहे. या जिल्ह्यात अहमदपूर, उदगीर, औसा, चाकूर, जळकोट, देवणी, निलंगा, रेणापूर, लातूर तालुका, शिरूर अनंतपाळ, असे दहा तालुके आहेत. या जिल्ह्याची निर्मिती 16/08/1982 रोजी झाली. या जिल्ह्याचे जिल्हा मुख्यालय लातूर आहे. हा जिल्हा महाराष्ट्रातील 16 वे मोठे नगर म्हणून ओळखला जातो. लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगाचा अभ्यास प्रस्तुत संशोधन समस्येतून केला जाणार आहे. दारिद्र्याचे प्रमाण वाढण्याची प्रामुख्याने आपणास काही कारणे सांगता येतील त्यामध्ये वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, निकृष्ट राहणीमान, अज्ञान, नैराश्य, शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष त्यामुळे झालेले साक्षरतेचे कमी प्रमाण, वाढती चलनवाढ इ. अनेक कारणे असलेली दिसून येतात. 'दारिद्र्य म्हणजे उत्पन्नाचा अभाव होय'. उत्पन्नाच्या अभावामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कुटुंबांच्या मासिक उत्पन्नानुसार लोकांच्या उपभोग साधनांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर सापेक्ष – निरपेक्ष, दारिद्र्य, साक्षरता, लिंग गुणोत्तर, बेकारी, दरडोई उत्पन्न, इत्यादी घटकांचा ग्रामीण भागातील लोकांचा उपभोगावर होणारा परिणामाचा अभ्यास करणे हे गरजेचे आहे. जिल्ह्यातील महाराष्ट्र शासनाच्या व भारत शासनाच्या BPL व APL लोकांसाठी असलेल्या शासकीय योजनांचा यात अभ्यास करणे अत्यंत महत्वाचे आहे. लातूर जिल्ह्यातील दारिद्र्यरेषा या समस्येचे संशोधन करत असताना दारिद्र्यरेषा म्हणजे काय हे माहित असणे गरजेचे आहे. दारिद्र्यरेषा म्हणजे दारिद्र्याचे प्रमाण मोजण्यासाठी उपभोग खर्चाच्या आधारावरती दारिद्र्यरेषा ठरवली जाते. एका व्यक्तीमागे एका महिन्याचा उपभोग खर्चाचा एक न्यून स्तर निश्चित केला जातो, त्याला मासिक प्रतिव्यक्ती उपभोग खर्च म्हणून संबोधले जाते. या खर्चापेक्षा कमी उपभोग खर्च करणा-या या व्यक्तीला गरीब किंवा दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असे म्हटले जाते. तर त्यापेक्षा अधिक खर्च करणा-या व्यक्तीला दरिद्र्यरेषेवरील व्यक्ती असे म्हटले जाते. उत्पन्न गटातील दारिद्र्याचा विचार करतो, तेव्हा पूर्वी झालेल्या विविध तज्ज्ञ व समित्यांची दारिद्र्य गणना नियोजन आयोग निती आयोग आणि संबंधित समित्यांची दरिद्र्य गणनांचा संबंधित साहित्य आढावा घेऊन हे संशोधन केले जाणार आहे.

2) संशोधनाची गरज :-

सदर संशोधन अभ्यासामुळे महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील व दारिद्रयरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांचा उपभोग, मासिक उत्पन्न, दरडोई उत्पन्न, दारिद्रयासंदर्भातील शासकीय योजना, साक्षरता, राहणीमान, आरोग्य, लोकसंख्या, लिंग गुणोत्तर, शिक्षण या संदर्भात सखोल ज्ञान घेऊन त्या संदर्भातील समस्यांचा शोध घेण्यासाठी हे संशोधन करणे गरजेचे आहे. सदर संशोधनातील समस्यांवर उपाययोजना सुचवणे गरजेचे आहे. नागरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात आजही साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे दारिद्रयरेषेखालील लोकांचा उपभोगावर होणारा परिणामांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे साक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी प्रोत्साहन म्हणून विविध कृती कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील दारिद्रयाचे प्रमाण कमी करण्यासाठी सदर संशोधन करणे गरजेचे आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील व दारिद्रयरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांचा उपभोगाचा अभ्यास करून ही समस्या सोडवणे सोपे होईल. या हेतूने हे संशोधन करणे खूप गरजेचे आहे.

3) संशोधनाचे महत्व :-

सदर संशोधन हे लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील व दारिद्रयरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्या बरोबर मासिक उत्पन्न, शासकीय योजना, दरडोई उत्पन्न, चलनवाढ, शिक्षण, साक्षरता, राहणीमान, लोकसंख्या, लिंग गुणोत्तर, इत्यादी घटकांचा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकांच्या उपभोगावर होणारा परिणाम हे संशोधनाच्या दृष्टीने व ज्ञान प्राप्तीच्या दृष्टीने संशोधनाचे महत्त्व असलेले दिसते. सदर संशोधनातून ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील व दारिद्रयरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगवाढी संदर्भात उपाययोजना सुचवणे महत्त्वाचे आहे.

4) समस्या विधान :-

लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील व दारिद्रयरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगाचा एक तुलनात्मक अभ्यास. (2011 ते 2021)

5) कार्यात्मक व्याख्या :-

1. लातूर : महाराष्ट्रातील एक जिल्हा.

2. ग्रामीण : गांव - खेड्यांचा भाग.

3. दारिद्रयरेषा : दारिद्रयाचे प्रमाण मोजण्यासाठी उपभोग खर्चाच्या आधारावरती ठरवली जाते.

4. दारिद्रय : मानवी जीवनाच्या गरजा न भागवता येण्याची परिस्थिती म्हणजे दारिद्रय होय.

5. उत्पन्न : हे एक असे साधन आहे ज्याद्वारे आपण आपल्या उदरनिर्वाहपुरता आपल्या दैनंदिन जीवनावश्यक गरजा भागविण्यापुरते पैसे कमवत असतो.

6. उपभोग : सध्याच्या गरजा आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी संसाधने वापरण्याची क्रिया हे गुंतवणुकीच्या विरूद्ध दिसते जे भविष्यातील उत्पन्न मिळवण्यासाठी खर्च करते.

7. लोकसंख्या : विशिष्ट वेळी एखाद्या प्रदेशात असलेली लोकांची एकूण संख्या म्हणजे त्या प्रदेशाची लोकसंख्या आहे.

8. साक्षरता : सात वर्षावरील व्यक्ती जी कोणतीही एक भाषा वाचू अथवा लिहू शकते त्यास साक्षर असे म्हटले जाते. (संयुक्त राष्ट्र संघटनेनुसार लिहिता वाचता येण्याची क्षमता म्हणजे साक्षरता होय.)

10. लिंग गुणोत्तर एखाद्या प्रदेशातील एकूण लोकसंख्येत दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या किती आहे. यास लिंग गुणोत्तर म्हणतात.

11. डॉ. ओझा यांनी मांडलेली दारिद्र्याची व्याख्या " मनुष्याने आपल्या रोजच्या आहारातून शरीरास आवश्यक असलेल्या कॅलरीज घेणे फार गरजेचे असते. ह्या कॅलरीजचे प्रमाण २२४० इतके असावे लागते. पण आपणास आपल्या आहारातूर २२४० पेक्षा कमी कॅलरीज प्राप्त होत असतील तर आपण दारिद्र्यात आहे असे समजावे."

6) संशोधनाची उद्दिष्टे :-

सदर संशोधनामध्ये लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगाचा एक तुलनात्मक अभ्यास या विषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त करून देण्यासाठी संशोधनाची खालील उद्दिष्टे ठरवण्यात आली आहेत.

1) लातूर जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगाच्या आधारावर ग्रामीण भागातील फरकांचे विश्लेषण करणे.

2) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील निरपेक्ष व सापेक्ष दारिद्र्य या मधील तफावत अभ्यासणे.

3) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य या संकल्पनेतील आर्थिक व सामाजिक बाजू अभ्यासणे.

4) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबाच्या मासिक उत्पन्नानुसार उपभोग साधनांचा अभ्यास करणे.

5) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील कुटुंबांसाठी राबविलेला विविध शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

6) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकांच्या उपभोगानुसार वस्तू व सेवांचा अभ्यास करणे.

7) संशोधनाची गृहीतके :-

1) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात दारिद्र्रेषेखालील उत्पन्न गटातील लोकांचा उपभोग कमी आहे.

2) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात बेरोजगारीचा परिणाम दारिद्र्यावर झालेला आहे.

3) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगात

तुलनात्मक दृष्ट्या तफावत असलेली दिसून येते.

4) शासकीय योजनांचा लाभ ग्रामीण भागात दारिद्र्यरेषेवरील लोकांपेक्षा दारिद्र्यरेषेखालील लोकांना अधिक मिळतो.

8) संशोधनाची व्याप्ती:-

सदर संशोधनाचा विषय हा महाराष्ट्रातील मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यापुरता मर्यादित आहे.

9) संशोधनाची मर्यादा:-

सदर संशोधन करत असताना लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगाचा एक तुलनात्मक अभ्यासापुरताच मर्यादित आहे.

10) संशोधन कालावधी:-

सदर संशोधन करत असताना संशोधकाने संशोधन अभ्यासाचा कालावधी २०११ पासून २०२१ असेल.

11) संशोधन पद्धती:-

सदर संशोधन करत असताना संशोधक लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगाचा एक तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी संशोधक वर्णनात्मक पध्दाती, सर्वेक्षण पद्धतीचा वापर करणार आहे.

12) संशोधनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रामुख्याने वर्तमानपत्रातील संदर्भ, अर्थशास्त्रातील विविध संदर्भ ग्रंथ, विविध वेबसाइटवरील माहितीचा आढावा, मागील संशोधनाचा आढावा, सदर संशोधनाच्या संबंधित शोधनिबंध अशा विविध द्वितीयक स्वरूपातील माहिती साधनाचा उपयोग केला जाणार आहे. तसेच प्राथमिक तथ्यसंकलना करीता प्रश्नावली व मुलाखतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

13) न्यादर्श/नमुना निवड :-

सदरील संशोधनाकरीता प्राथमिक तथ्य संकलना करीता, महाराष्ट्रातील, मराठवाड्यातील लातूर जिल्हा हा निवडण्यात आला आहे. त्या करीता लातूर जिल्ह्यातील एकूण 10 तालुक्यातून संशोधक सहेतूक नमुना निवडीद्वारे निवडक गावातून संशोधक संशोधन करताना लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ५०० दारिद्र्यरेषेखालील व ५०० दारिद्र्यरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांच्या उपभोगाचा एक तुलनात्मक अभ्यास करताना १००० नमुना निवडीद्वारे तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

14) सांख्यकीय परिमाण :-

सदर संशोधनात लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील उत्पन्न गटातील लोकांचा उपभोगाचा अभ्यास करत असताना सांख्यिकीय परिमाण संशोधक वापरणार आहे. त्यामध्ये T Test, F Test,

सरासरी, गुणोत्तर, टक्केवारी, वारंवारिता, तक्ते, आलेख, पायचार्ट, बारचार्ट, एरिया चार्ट, अशा इत्यादी सांख्यिकीय परिमाणांचा वापर संशोधक संशोधनात करणार आहे.

15) प्रकरण रचना / संशोधन प्रकरणाची नियोजित रचना :-

1) प्रकरण पहिले :- प्रस्तावना

2) प्रकरण दुसरे :- संशोधन साहित्याचा आढावा.

3) प्रकरण तिसरे :- लातूर जिल्ह्यातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती चे समालोचन.

4) प्रकरण चौथे :- माहितीचे संकलन व अर्थनियोजन.

5) प्रकरण पाचवे :- लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व दारद्रिरेषेवरील लोकांच्या उपभोगाचा तुलनात्मक अभ्यास.

6) प्रकरण सहावे :- लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यासंदर्भात शासकीय योजनांचा आढावा.

7) प्रकरण सातवे :- संशोधन सारांश, निष्कर्ष व शिफारशी.

16) संदर्भ ग्रंथ

1) प्रा. रायखेलकर ए. आर. , प्रा. डॉ. दामजी बी. एच. भारतीय अर्थव्यवस्था, विद्याबुक्स पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद.
2) अन्नदाते शशिकांत, संशोधन पध्दती, २०१९ के. सागर पब्लिकेशन स्वप्नशील, शनिवार पेठ पुणे, ४११०३०
3) डॉ. किरण जी. देसले., भारतीय अर्थव्यवस्था, २०१२ दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव.
4) दांडेकर वी.एम. एंड नीलकांथ रथ १९७१. पावर्टी इन इंडिया, इंडियन स्कूल ऑफ पॉलिटीकल अकॉनॉमी, पुणे.
5) नौरोजी दादाभाई १९९६. पावर्टी एंड अनब्रिटीश रूल इन इंडिया, पब्लिकेशन डिविजन, मिनिस्ट्री ऑफ इनफॉरमेशन एंड ब्रॉडकास्टिंग, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, संकंड एडीशन.
6) डॉ. संतोष मनोहर मोटेगावकर, स्थूल अर्थशास्त्र २०२१, अरूणा प्रकाशन १०३, ओमकार कॉम्प्लेक्स – अ, खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर.
7) सेन अमर्त्य १९९९. पावर्टी एंड फेमींस, एन. एस. ऑन एनटाइल्मेंट एंड डिप्राइवेशन, ऑक्सफॉर्ड युनिवर्सिटी प्रेस, नई दिल्ली.
8) बी. एस. मिनहाल, एल. आर. जैन एंड एड. डी. तेंडुलकर (१९९१), डिक्लाइनिंग इंसिडेंस ऑफ पावर्टी इन दी १९८०, उविडेंस बर्सस आट्रीफैक्स, इकॉनामिक एंड पॉलिटीकल वीकली, जुलाई ६-१३.
9) आर्थिक सर्वेक्षण (२००४-०५), वित्त मंत्रालय, भारत सरकार.
10) आर्थिक सर्वेक्षण (२०११-१२), वित्त मंत्रालय, भारत सरकार.

~: संशोधक विद्यार्थी :~

साबणे प्रशांत दत्तात्रय
सामाजिक शास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,.
नांदेड, उपकेंद्र लातूर

~: मार्गदर्शक :~

प्रा. डॉ. आनंद तुकाराम शेवाळे
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.